प्रेस नोट                    दिनांक. ०१/०८/२०२४

आरोपी लोकसेवक दत्ता संतराम होनमणे , वय ४७ वर्षे, पद तलाठी सज्जा फुलकळस, ता. पूर्णा, जि. परभणी (वर्ग ३) यांचेवर ४०,०००/- रुपयांची लाचमागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे.ताडकळस जि.परभणी गुरनं १५९/२०२४<br>कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | दत्ता संतराम होनमणे , वय ४७ वर्षे, पद तलाठी सज्जा फुलकळस, ता. पूर्णा, जि. परभणी (वर्ग ३),रा. ताडकळस ता.पूर्णा जि.परभणी ह.मु सरफराज नगर परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८०,०००/- रु. |
| स्विकारलेली लाच रक्कम | एकुण लाचमागणी रक्कमेपैकी पहिला हप्ता ४०,०००/- रु |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे नावे फुलकळस शिवारात एकूण २ गुंठे जमीन विकत घेतली आहे. बँकेचे कामासाठी जमिनीचा फेरफार करून सातबारावर नोंद घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दि. ०५/०७/२०२४ रोजी तक्रारदार यांनी आलोसे तलाठी दत्ता होणमाने यांची भेट घेतली व कागदपत्रे देऊन फेरफार होणेसाठी विनंती केली. दि. २२/०७/२०२४ रोजी तक्रारदार हे आलोसे तलाठी होणमाने यांना फेरफारच्या कामासाठी भेटले असता आलोसे तलाठी होणमाने यांनी तक्रारदार यांना प्रती गुंठा ४०,०००/- रुपये याप्रमाणे फेरफारचे कामासाठी एकूण ८०,०००/- रुपये मला द्यावे लागतील अशी मागणी केली. सदर रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. २९/०७/२०२४ रोजी एसीबी परभणी येथे त्याबाबत तक्रार दिली.

दि. ०१/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान आलोसे तलाठी दत्ता होणमाने यांनी तक्रारदार यांना त्यांचे पत्नीचे नावे असलेल्या जमिनीच्या फेरफारचे कामासाठी प्रती गुंठा ४०,०००/- रुपये प्रमाणे एकूण ८०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून ४०,०००/- रुपये लगेच आणून देण्यास सांगितले.

त्यावरून पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे तलाठी दत्ता होणमाने यांनी तक्रारदार यांच्याकडून ४०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली आहे. आलोसे तलाठी दत्ता होणमाने यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे पोलीस उप अधिक्षक श्री. अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक श्री.बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक श्री.सदानंद वाघमारे व टिम एसीबी परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री. बसवेश्वर जकिकोरे,पोलीस निरीक्षक लाप्रवि युनिट,परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी.** | |
| **दुरध्वनी क्रमांक :– 02452–220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net** | |
| **मा. पोलीस अधीक्षक 9623999944** | **पोलीस उप अधीक्षक 9850483337** |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| **Facebook : Acb Parbhani** | **Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani.** |
| **Instagram : acbparbhani** | **Twitter : @ACBPARBHANI** |
| **Youtube Channel @ACBParbhani** | **Find office Loaction on Google Map & Mappels india Map** |

पोलीस उप अधीक्षक कार्यालय परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी